महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना
पदोन्नतीचा मानीव दिनांक देणे बाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग,
शासन आदेश क्र.आकृवि-१५२५/प्र.क्र.१७०/१५-अे
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ सप्टेंबर, २०२६

संदर्भ :-

१) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे, यांचे पत्र क्र. एवायझेड/मकृगट-ब/प.मा. दिनांक/४३९/आस्था १/ दि. ०५/०८/२०२५

२) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे, यांचे पत्र क्र. एवायझेड/मकृगट-ब/प.मा. दिनांक/९३/२०२६, दि. ०३/०२/२०२६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गाच्या सन २०२०-२१ निवडसूची करीता ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या विचारकक्षेतील श्री.विजयकुमार नांदे व श्री.दिलीप जाधव यांचेविरुध्द विभागीय चौकशी चालू असल्याने शासन निर्णय दि.१५.१२.२०१७ मधील तरतुदीनुसार मोहोरबंद पाकीटात प्रकरण ठेवण्यात आले होते. श्री.विजयकुमार नांदे यांचेविरुध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी दि.०६.०६.२०२३ च्या आदेशान्वये त्यांना "समज" देण्यात आली आणि श्री.दिलीप विजय जाधव यांचेविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीमध्ये दि.०६.०२.२०२३ च्या शासन आदेशान्वये त्यांना "दोषमुक्त" करण्यात आले. तद्नंतर श्री.नांदे व श्री.दिलीप जाधव यांचा सन २०२२-२३ च्या निवडसूचीमध्ये समावेश करुन अनुक्रमे दि.२५.०९.२०२४ व दि.१४.०८.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गाच्या सन २०२२-२३ च्या निवडसूचीच्या विचारकक्षेतील श्री. विनायक पायघन यांचा परिविक्षा कालावधी समाप्तीचा प्रस्ताव तसेच स्थायित्व प्रमाणपत्र प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबीत असल्याकारणाने विभागीय पदोन्नती समितीने त्यांचे पदोन्नतीचे प्रकरण खुले ठेवले होते. कृषि विभाग, शासन निर्णय दि.२७/०२/२०२३ अन्वये श्री.पायघन यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला तसेच शासन निर्णय, दि.०२/०३/२०२३ अन्वये त्यांना स्थायी घोषीत करण्यात आले. तद्नंतर श्री. पायघन यांना शासन आदेश, दि.१४/०८/२०२३ अन्वये महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे. तसेच सदर निवडसूचीच्या विचारकक्षेतील श्री.शिवा जाधव यांचेविरुध्द विभागीय चौकशीअंती कृषी आयुक्तालयाच्या दि.०२.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये "ठपका ठेवणे" ही शिक्षा देण्यात आली आहे. तद्नंतर त्यांना दि.०६/०९/२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने श्री.विजयकुमार नांदे, श्री.दिलीप विजय जाधव, श्री.विनायक पायघन व श्री.शिवा बाबु जाधव या अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवाकनिष्ठ अधिकाऱ्यांचा महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या संवर्गातील पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्याचा दिनांक मानीव दिनांक म्हणून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

श्री.विजयकुमार नांदे, महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब यांना त्यांच्या सेवाकनिष्ठ अधिकारी यांचा श्रीमती मनिषा भुजबळ दि.०५.०४.२०२२, श्री.दिलीप जाधव, महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब यांना त्यांच्या सेवाकनिष्ठ अधिकारी श्रीमती निभा डहाके यांचा दि.०१.०४.२०२२, श्री. विनायक पायघन, महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब यांना त्यांचे सेवाकनिष्ठ अधिकारी श्री. सागर इंगोले यांचा दि.१२.०६.२०२३ आणि श्री. शिवा जाधव, महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब यांना त्यांच्या सेवाकनिष्ठ अधिकारी यांचा दि.२७.०६.२०२३ हा पदोन्नतीच्या पदावरील रुजू दिनांक पदोन्नतीचा मानीव दिनांक म्हणून खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अधिकाऱ्याचे नाव	पदोन्नतीचे पद	निकटतम अधिका-याचे नाव/पदोन्नतीचा दिनांक	प्रत्यक्ष पदोन्नतीचा दिनांक	पदोन्नतीच्या पदाचा मंजूर करण्यात येत असलेला मानीव दिनांक
श्री.विजयकुमार नांदे	महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब	श्रीमती मनिषा भुजबळ	२५.०९.२०२४	०५.०४.२०२२
श्री.दिलीप जाधव	महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब	श्रीमती निभा डहाके	१४.०८.२०२३	०१.०४.२०२२
श्री. विनायक पायघन	महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब	श्री. सागर इंगोले	१४.०८.२०२३	१२.०६.२०२३
श्री. शिवा जाधव	महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब	श्रीमती सारिका जगताप	०६.०९.२०२४	२७.०६.२०२३

२. सदर मानीव दिनांक खालील अटीच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे:-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम-३२ मधील परंतुकानुसार जर शासकीय कर्मचाऱ्यास मानीव दिनांक देण्यात आला असेल तर, त्याला दिलेल्या मानीव दिनांकापासून त्याची काल्पनिक वेतन निश्चिती करण्यात येईल, त्यानुसार त्या पदाचा प्रत्यक्ष कार्यभार धारण केल्याच्या दिनांकापासून वेतन काढण्यात येईल.

२) श्री.विजयकुमार नांदे यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या पदोन्नतीच्या पदावर मंजूर करण्यात आलेला दि.०५.०४.२०२२ हा पदोन्नतीचा मानीव दिनांक, ते महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील पदावरुन महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने, श्री.दिलीप जाधव यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या पदोन्नतीच्या पदावर

मंजूर करण्यात आलेला दि.०१.०४.२०२२ हा पदोन्नतीचा मानीव दिनांक, ते महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील पदावरुन महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने, श्री.विनायक पायघन यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या पदोन्नतीच्या पदावर मंजूर करण्यात आलेला दि.१२.०६.२०२३ हा पदोन्नतीचा मानीव दिनांक, ते महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील पदावरुन महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने, तसेच श्री.शिवा जाधव यांना महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब या पदोन्नतीच्या पदावर मंजूर करण्यात आलेला दि.२७.०६.२०२३ हा पदोन्नतीचा मानीव दिनांक, ते महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील पदावरुन महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या अनुषंगाने, सदर अधिकारी सदर पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापर्यंत त्यांची काल्पनिक वेतननिश्चिती करण्यात यावी. तथापि, सदर काल्पनिक वेतननिश्चितीच्या अनुषंगाने वेतन व भत्त्यांची थकबाकी, श्री.नांदे, श्री.दिलीप जाधव, श्री.पायघन तसेच श्री.शिवा जाधव यांना अनुज्ञेय राहणार नाही.

३. हे आदेश, संबंधीत वर्षाच्या निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त होण्याच्या अधीन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या व वित्त विभागाच्या प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०११२५६१९६८४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANTOSH SHALIGRAM PANZADE
Date: 2026.09.01 12:57:23 +05'30'

(संतोष पानझाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / (लेखापरिक्षा) / मुंबई/नागपूर
२. कृषि सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
३. संबंधित विभागीय कृषि सह संचालक,
४. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
५. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
६. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग, (सेवा-३) मंत्रालय, मुंबई- ३२
८. संबंधित अधिकारी द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. निवड नस्ती /१५-अे